| MHLA050009282016 | नियमीत दरखास्त क्र.१८६/२०१६<br>श्रीरामा ट्रान्सपोर्ट वि. माधव व अन्य |
|---|---|

**<u>नि.क्र. ३३ खाली आदेश</u>**

**०१.** अर्जदार यांनी जाबदार क्र.२ यांच्याविरुध्द दिलेल्या तुरुंग वॉरंट अर्जावर जाबदार क्र.२ यांनी नि.क्र.३८ लगत दिलेल्या म्हणण्यानूसार जाबदार क्र.१ याची मिळकत विक्री करुन आधी रक्कम वसुल करुन घेण्यात यावी व तशी न झाल्यास जाबदार क्र.२ विरुध्द कारवाई करावी असे नमूद आहे.

**०२.** सदर जाबदार क्र.१ व २ यांच्याविरुध्द लवादाने दिलेला निर्णय हा वैयक्तीक व सामुदायीक जबाबदारीप्रमाणे परतफेडीचा आहे. त्यामुळे, कोणाही जाबदाराविरुध्द आदेश करता येईल. जाबदार क्र.२ याला नोटीस बजावणी झाल्यानंतर. त्याने रक्कम भरण्याची तजवीज ठेवली नाही. तो म्हणतो तसे प्रथम जाबदार क्र.१ विरुध्द कारवाई केल्याशिवाय त्याच्याविरुध्द कारवाई करू नये, असे करता येणार नाही. जाबदार क्र.२ हा सुध्दा जाबदार क्र.१ च्या बरोबरीने लवादामध्ये जबाबदार धरण्यात आला आहे. त्यामुळे, जाबदार क्र.२ विरुध्द आवश्यक तुरुंग निर्वाह भत्ता अर्जदाराने आजच्या आज भरुन ७ दिवसांसाठी दिवाणी तुरुंग वॉरंट जारी करावे. यादरम्यान जाबदाराने किंवा त्याच्या वतीने कोणीही दरखास्तीत नमूद रक्कम भरल्यास सदर वॉरंटाची बजावणी करु नये किंवा बजावणी करुन जाबदार क्र.२ हा दिवाणी तुरुंगात असल्यास आणि दरम्यानच्या काळात दरखास्तीची रक्कम भरण्यात आली तर तसे तात्काळ न्यायालयाच्या निर्दशणास आणून द्यावे जेणेकरुन जाबदार क्र.२ याला सोडण्याचा आदेश करता येईल.

स्वाक्षरीत/-

**[एस.एन.सरडे]**

**दिनांक: ०८/१२/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.**